

आजी–आजोबांच्या
छान छान गोष्टी
मोहन रावळ
परी प्रकाशन

आजी-आजोबांच्या छान छान गोष्टी

◆


© सुरक्षित

◆

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆


**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆

**किंमत :**
रुपये १२०/-

## अनुक्रमणिका

१. रातराणी हसली ........ ४
२. मी कोणाला खाऊ? ........ ६
३. पड रे पड ........ ८
४. शापित सुंदरी ........ १३
५. टिंबा टिंबा ........ २०
६. खरा श्रीमंत ........ २३
७. कामचुकाराला बक्षीस ........ २५
८. लबाड कोल्हा ........ २७
९. सुरवंती ........ २९
१०. गोपूशेठ स्वर्गाला गेला ! ........ ३५
११. चतुर बाळकाराम ........ ३८
१२. सुलेमानी ताईताचे रहस्य ........ ४०
१३. जशास तसे ! ........ ५४
१४. माया मोहिनी ........ ५५
१५. अति हाव घाली घाव ........ ६३
१६. जागूमलची हुशारी ........ ६६
१७. खरे आणि खोटे ........ ६७
१८. मस्तवाल शंभूनाथ ........ ६९
१९. गर्व करू नका ........ ७१
२०. असं होतं कधी कधी ........ ७४
२१ खरा मित्र ........ ७६
२२. अज्ञात बेट ........ ८०
२३. चतुर सावकार ........ ८७
२४. त्याला राम भेटला ! ........ ८९
२५. चोरांच्या बायका ........ ९२
२६. कपटी तिरकट ........ ९४
२७. समज-गैरसमज ........ १००
२८. गुरूभेट ........ १०५
२९. गुरू आणि शिष्य ........ १०८
३०. सत्याचा पाठीराखा ........ १०९
३१. कोतवालाचा न्याय ........ ११३
३२. जमाल आणि कमाल ........ ११४
३३. माझं काय चुकलं ? ........ १२५
३४. दागिन्यांना दिला मान ........ १३०
३५. माणुसकीची गोष्ट ........ १३२
३६. विश्वासघातकी ........ १३४
३७. मनात येईल ते ! ........ १४०
३८. शिकवण साधूची ........ १४२
३९. साधूचा अपमान ........ १४४
४०. शकुन-अपशकुन ........ १४६
४१. क्रूर चेटकीण ........ १४८
४२. देणाऱ्याच्या हाताची लाज ........ १५४
४३. चुकलेली वाट ........ १५७
४४. घमेंड करते घात ........ १५९
४५. पारतंत्र्यातून सुटका ........ १६०



# आजी-आजोबांच्या छान छान गोष्टी

आजी आणि आजोबा कणकवलीहून पुण्याला आले. तेव्हा दुपारचे चार वाजले होते. दीपा व मनोज शाळेला गेले होते. ही नातवंडे केव्हा एकदा येऊन भेटतात असं त्यांना झालं होतं. दोन्हीही नातवंडं गोड स्वभावाची होती. मनोज आजीला बिलगून रहायचा. तर दीपा आजोबांच्या कुशीत शिरायची.

बरोबर सव्वा सहा वाजता स्कूलबस दारात येऊन थांबली आणि दीपा व मनोज धावतच घरात आले. त्यांनी आल्या आल्या आईला विचारलं, 'आई, आजी– आजोबा आलेत ना?'

'नाही रे !' आई म्हणाली.

'खोटं बोलू नकोस. आजोबांच्या व आजीच्या चपला दारात आहेत. मग दोघा नातवंडांनी त्यांना मोठमोठ्याने 'आजी...आजोबा...' अशा हाका मारायला सुरुवात केली. आजोबा स्कूलबस आलेली पाहून बेडरूमच्या दाराच्या मागे लपले होते. मनोज बेडरूममध्ये आला आणि त्याने आजोबांना पकडले. तसे आजोबा हसू लागले. 'आजोबा, आजी नाही आली?' दीपानं विचारले.

'नाही रे बाळांनो.' आजोबा म्हणाले.

'फसवायचं नाही हं! आजी पण आलीय.'

'आलीय ना तर शोधा ना तिला.' आजोबा म्हणाले.

दीपा व मनोजनं सगळं घर शोधलं, पण आजी दिसलीच नाही. मुलं हिरमुसली. आईने मग हळूच बाबांच्या खाटेखाली लपलीय असं डोळ्यांनी खुणावलं. त्याबरोबर मुलांनी बेडखालची गादी बाहेर ओढली. गादीमागे आजी अगदी गुपचूप पोटाशी पाय घेऊन लपली होती. 'आजोबा आजी सापडली!' मनोज ओरडला व तिच्या हाताला धरून बाहेर ओढू लागला. त्यांची आई हसू लागली.

'हे काय गं आजी, अशी लपून राहतेस होय?' दीपा गाल फुगवून म्हणाली.

'अगं, गंमत केली! चला हातपाय धुवा. देवाला दिवा लावा आणि शुभंकरोती म्हणा बघू!'

'अगं शुभंकरोती पाठ आहे. रोज म्हणतो आम्ही!' मनोज म्हणाला.

'मला म्हणून दाखवा. बरोबर येते की नाही ते ऐकेन हो मी.' आजी म्हणाली.

'शुभंकरोती म्हणू. पण तू गोष्टींचा खजिना घेऊन आलीस ना?' मनोजने विचारले.

'हो आणलाय. गोष्ट रात्री झोपताना. आता शुभंकरोती म्हणा!'

रात्री जेवण झाल्यावर आजी-आजोबा बेडरूममध्ये आले. मनोजने आजीच्या मांडीवर डोके ठेवले. तर दीपा आजोबांच्या पुढ्यात येऊन बसली.

'आजी एक गोष्ट तू सांगायची. नंतर आजोबा एक गोष्ट सांगतील!'

'बरं ऐका हं!' आजीने गोष्ट सांगायला सुरुवात केली.



## रातराणी हसली


स्वर्गात ब्रह्मदेवाच्या बागेत विश्वकर्माने अनेक प्रकारची फुलझाडं लावली होती. त्यात गुलाब, चाफा, शेवंती, झेंडू, मोगरा, गुलबक्षी, निशिगंधा सगळ्या प्रकारची फुलं होती. प्रत्येकाचा रंग वेगळा होता. ती वाऱ्याबरोबर हलत डुलत होती.

एकदा ब्रह्मदेव त्या बागेत आले. त्यांनी सर्व फुलांवरून प्रेमाने हात फिरवला. 'देवा, ही सगळी फुलं तुमची कृतार्थ आहेत. पण नुसत्या रंगानं त्यांची ओळख होण्यापेक्षा जर त्यांना सुवास दिलात तर ती धन्य होतील.'

'ठीक आहे. उद्या सकाळी या सर्व फुलांना माझ्या दरबारात पाठवून दे. मी त्यांना अक्षय सुवास देईन.' असे म्हणून ब्रह्मदेव निघून गेले.

दुसऱ्या दिवशी विश्वकर्माने सर्व फुलांना ब्रह्मदेवाच्या दरबारात आणले व सर्वांना एका रांगेत उभे केले. ब्रह्मदेव एका काडीला कापूस गुंडाळून वेगवेगळ्या कुपीतील सुवास प्रत्येक फुलावर

ठेवत होते. इतक्यात धावतपळत अगदी लवंगेएवढं पांढरं फूल आलं, आणि रांगेत उभं राहिलं. सर्वजण त्या एवढ्याशा फुलाकडं पहात राहिले. मोगऱ्याने घोगऱ्या आवाजात विचारले, 'काय गं तू एवढीशी. आहेस तरी कोण? आणि इतक्या उशिरा का आलीस?'



'मला रात्रभर जागरण झालं ना! मी रात्रीच उमलते.' ती एवढीशी रातराणी म्हणाली.

'बघा आम्ही सूर्याचं तोंड बघून उमलतो. ही एकटीच चंद्राला बघून खुलते.' सूर्यफूल कमळाला धक्का मारत म्हणाले. त्याबरोबर सगळे रातराणीला चिडवून हसू लागले.

'काय गं? तू रात्री उमलतेस ना! मग तुला कशाला सुवास? सगळे तर रात्री झोपलेले असतात.' काटेरी केवडा चिडवत म्हणाला.

'केवड्या गप्प बस हं! नाहीतर मी रडेन.' रातराणी म्हणाली.

'अगं बाई, केवडा केवढा, ही केवढी? त्याला दम देती.' गुलाब फूल म्हणाले.

तोपर्यंत सर्वांना सुवास वाटून झाला. पण नेमक्या रातराणीला क्रम यायला आणि सुवास संपायला एकच वेळ झाली. सर्व फुले सुवास घेऊन आनंदाने आपापल्या बागेत गेली. इवलेसे रातराणीचे फूल मात्र सुवास न मिळाल्याने रडत जाऊ लागले. ब्रह्मदेवाला रातराणीच्या फुलाची दया आली. त्याने सगळ्या कुप्यांतून कापसाची काडी फिरवली. तर भरपूर सुवास मिळाला. ब्रह्मदेवाने रातराणीच्या इवलाश्या पाकळ्यांवर भरपूर सुवास ठेवला. अगदी पुरे पुरे म्हणावं वाटलं रातराणीला. रातराणी हसू लागली. 'मला तर सर्वांपेक्षा जास्त सुवास मिळाला.'

ब्रह्मदेव रातराणीला झालेला आनंद पाहून हसले व म्हणाले, 'तू इतकी सुवासिक होशील की, चंद्रालाही तुझा मोह पडेल. सर्पांना भुरळ पडेल आणि चांदण्या तुझा हेवा करतील.'

ते ऐकून रातराणी लाजली व आपल्या अंगणात आली.

'आजी आपल्या अंगणात रातराणी आहे?' मनोजने विचारले.

'हो आहे. तू उन्हाळ्याच्या सुट्टीत कणकवलीला ये. मग पाहशीलच की आपल्या दारातील रातराणी!'

आजीनं गोष्ट संपवली.

दीपा आजोबांना म्हणाली, 'आता आजोबा तुम्ही गोष्ट सांगा.'



# मी कोणाला खाऊ?

काशीहून पशू-पक्षी विद्या शिकून आलेला गुणीदास नावाचा एक साधू दक्षिणेकडे चालला होता. चालत चालत तो लक्ष्यग्रामात पोहोचला. त्यावेळी संध्याकाळ झाली होती. गुणीदास रात्रीच्या निवाऱ्यासाठी एका वृक्षाच्या पारावर आला. दिवसभर चारापाण्यासाठी भटकंती करून वेगवेगळी पाखरं त्या पारावरच्या झाडावर परतली होती.

झाडावरची पाखरांची किलबिल गुणीदास साधूला समजत होती. कारण त्याला पक्ष्यांची भाषा येत होती. त्यातले काही पक्षी दु:खी मनाने म्हणत होते, 'सुवर्णगिरी पर्वतावरचा दुष्ट शंखचूड नावाचा राक्षस उद्या फकीराला खाणार आहे. त्या फकीराने दुष्काळात कित्येक पशू-पक्ष्यांना अन्नपाणी दिले आहे. त्याचे खूप उपकार आम्हा पक्ष्यांवर आहेत. पण आपण लहान जीव एवढ्या मोठ्या राक्षसाबरोबर युद्ध करू शकत नाही.'

गुणीदास हा संवाद ऐकून उठला व सुवर्णगिरी पर्वताच्या दिशेने चालू लागला. वाटेत कंदगाव नावाचे एक छोटे गाव लागले. ते त्या सुवर्णगिरी पर्वताच्या पायथ्याशीच होते. गावात शिरल्याबरोबर गुणीदासला एक विचित्र दृश्य दिसले. एका घराच्या अंगणात एक फकीर बसला होता. त्याच्याभोवती कावळे, मोर, होले, कबूतर, चिमण्या वगैरे हजारो पक्षी त्याच्या अंगाखांद्यावर बसत आहेत. सगळीकडे पक्षीच पक्षी!

गुणीदास साधू पुढे गेला व त्याने त्या फकीराला वंदन केले व 'एवढे पक्षी तुम्हाला असे घेरून का बसलेत?' असे विचारले.

तेव्हा फकीर म्हणाला, 'हे सगळे मला भेटायला आले आहेत. सुवर्णगिरी पर्वतावर शंखचूड राक्षसाला रोज एक माणूस खायला द्यावा लागतो. आज माझ्यावर पाळी आली आहे. म्हणून हे पक्षी मला भेटत आहेत.'


ते ऐकून गुणीदास साधू म्हणाला, 'तू पूर्वजन्मी नक्कीच राजा असणार. लाखोंचा पोशिंदा आहेस. तुला बळी जाऊन चालणार नाही. मी एक साधू आहे. जगलो काय, मेलो काय, कुणाचं माझ्यामुळं अडणार नाही. त्यामुळे त्या शंखचूड राक्षसाचे खाद्य म्हणून मी जातो.'

'महाराज, माझ्याऐवजी तुम्ही बळी जावं हे मला पटत नाही.' फकीर म्हणाला.

'नाही मीच शंखचूडकडे जाणार.' गुणीदास निग्रहाने म्हणाला.

'छे! छे!! मी कधीच स्वार्थ बघितला नाही. मीच त्या राक्षसाचे खाद्य होणार.' फकीर म्हणाला.

अखेर फकीर व साधू दोघेही सुवर्णगिरी पर्वताकडे निघाले. शंखचूड राक्षस खाद्याची वाट पहात एका मोठ्या दगडावर बसला होता. हिरव्या कपड्यातला फकीर व भगव्या कपड्यातला साधू अशी दोन माणसं एकावेळी चालत जवळ येत आहेत हे पाहून राक्षसाला आश्चर्य वाटले. शिवाय



ते दोघे आपसात भांडत आहेत हे पाहून शंखचूड हाताची घडी घालून त्यांच्याकडे पहात राहिला. आजपर्यंत जेवढी माणसं आली ती भयानं थरथरत होती. रडत होती. पण हे दोघे तर भांडताहेत. हा काय प्रकार? तो मनात विचार करू लागला.

शंखचूडजवळ येत गुणीदास ओरडून म्हणाला, 'अरे फकीरा, राक्षस असला म्हणून काय झालं? त्याला काय आपला जीव नकोसा झालाय? तुला जर या राक्षसानं खाल्लं तर त्याचं डोकं फटकन् फुटणार आहे, हे त्या बिचाऱ्याला काय ठाऊक?'

शंखचूड घाबरला.

'अहाहा! आणि साधूबुवा तुला खाल्लं तर या राक्षसाचे पोट फुगून फटकन् फुटणार आहे, हे तरी त्याला माहीत आहे का?'

'कुणालाही खाल्लं तरी शंखचूड मरणारच आहे ना? मग मला खाऊ दे!' गुणीदास म्हणाला.

'मला खाल्लं तर तुझं काय बिघडणार आहे?' फकीर ओरडला.

त्या दोघांची अशी भांडणं ऐकून शंखचूड राक्षस धूम पळत सुटला. तो पुन्हा कधी कुणाला त्रास द्यायला आलाच नाही.

गोष्ट संपवून आजोबांनी विचारलं, 'काय दीपा, कशी वाटली गोष्ट?'

'ए आजी, आता तू सांग ना गोष्ट!' मनोज म्हणाला.

'सांगते ऐका!' आजी म्हणाली.



# पड रे पड

एकदा लक्ष्मी आणि विष्णू गरुडावर बसून आकाशमार्गाने वैकुंठाला निघाले होते. इतक्यात लक्ष्मीच्या कानावर एका माणसाच्या रडण्याचा आवाज आला. तिने दिव्य दृष्टीने पाहिले. एक गरीब उंबराच्या झाडाखाली बसून रडत होता व मोठ्याने म्हणत होता, 'अशा दारिद्रयात जगण्यापेक्षा मेलेलं बरं!'

ते ऐकून लक्ष्मीला त्याची दया आली. ती विष्णूला म्हणाली, 'वैकुंठेश्वरा, तुमचा एक भक्त विलाप करत आहे. त्याची हाक तुम्हाला ऐकू येत नाही का?'

'सगळं ऐकतोय मी. त्याला जेवढे द्यायला हवे होते, तेवढे मी दिले होते, पण त्याला ते टिकवता आले नाही. आता उगाच रडतोय झालं.'

'दीनानाथ म्हणवून घेता आणि तुम्हाला त्याची दया येत नसेल तर मीच कुठंतरी निघून जाते.' लक्ष्मी चिडली.

'सखे, तू कमालीची हट्टी. तेथढीच चंचल. चल बघू तो सदाशिव का रडतो ते पाहू.' असे म्हणून विष्णू व लक्ष्मी एका कुंभार व कुंभारणीच्या रूपात त्याच्यासमोर एक मडकं घेऊन आले.

'सदाभाऊ, अवं का रडताईसा?' कुंभारानं विचारलं.

'काय सांगू कुंभारदादा, काल मजुरीचे पैसे मिळाले होते. पण माझ्या मित्राचा मुलगा अचानक आजारी पडला. त्याच्या दवापाण्यासाठी मी ते पैसे मित्राला दिले. मला हो काय माहीत, घरात डाळ-तांदूळ नाहीत ते! मी मित्राला पैसे दिले म्हणून बायकोने मला घराबाहेर काढले. मी जर श्रीमंत असतो तर बायकोने असं घराबाहेर काढलं असतं का?' सदाशिव म्हणाला.

कुंभारीण बनलेली लक्ष्मी पदरात तोंड लपवून हसू लागली. ते विष्णूनं पाहिलं. विष्णू सदाशिवला हातातले मडके देत म्हणाले, 'सदा, हे मडके माझ्या आजाचे आहे. ते 'पड पड' म्हणत उलटं कर म्हणजे त्यातून डाळ व तांदूळ पडत राहील. जेवढे डाळ- तांदूळ हवेत. तेवढे पुरे झाले की मडके सरळ कर म्हणजे डाळ-तांदूळ पडणार नाहीत. सांभाळ हे मडके!' म्हणून विष्णू व लक्ष्मी अदृश्य झाले.

सदाशिवनं ते मडकं घेतलं आणि 'पड पड' म्हणाला. त्याबरोबर डाळ व तांदूळ पडू लागले. सदाशिवला खूप आनंद झाला. तो घराकडं जायला निघाला होता. पण त्याला वाटले की, देवळात जाऊन देवाचे आभार मानावेत म्हणून तो देवळाकडे जायला निघाला. वाटेत घारूमामा नावाच्या वाण्याचे दुकान लागले. सदाशिव मनात म्हणाला, 'चांगल्या कामगिरीसाठी देवळात

निघालोय, तिथं मडकं कशाला न्या?' म्हणून तो घारूमामाच्या दुकानात आला व म्हणाला, 'घारूमामा, मी देवदर्शनाला देवळात निघालो आहे. माझं एवढं मडकं ठेवून घ्या.'

'आण इकडे' म्हणत घारूमामाने ते मडकं घेतलं व नारळाच्या पोत्यावर ठेवलं. इतक्यात एक उंदीर त्या पोत्यावर चढू लागला. घारूमामाने हातातली काठी उंदरावर मारली. उंदीर गेला पळून पण मडके मात्र घसरून खाली आले व पालथे झाले. 'आता पडलं असतं, पड पड म्हणताही आलं नसतं' घारूमामा सहज बोलला आणि चमत्कारच झाला. मडक्यातून डाळ– तांदूळ पडू लागले. घारूमामाने मडके सरळ केले. डाळ–तांदूळ पडायचे थांबले. 'हे जादूचे मडके दिसते.' असं म्हणत घारूमामाने मडके बदलले. सदाशिव देवळातून आल्यावर घारूमामाने आपल्याजवळचे दुसरे मडके दिले.

मडके घेऊन सदाशिव आनंदाने घरी आला व बायकोला म्हणाला, 'आजपासून आपली गरिबी संपली. दुर्दैव हरले. आपण आता श्रीमंत होणार.' त्याने तिच्यासमोर ते मडके धरले व पालथे करून म्हणाला, 'पड रे पड!'

मडक्यातून डाळ– तांदूळ पडेनात. बायको संतापली व म्हणाली, 'सकाळी भांडण झालं होतं तेच बरं होतं.' तिनं ते मडकं हिसकावून घेतलं व दणकन् आपटलं. तसा सदाशिव भ्याला व घरातून बाहेर पडला. पुन्हा उंबराच्या झाडाखाली आला व मोठमोठ्याने रडू लागला.

लक्ष्मी म्हणाली, 'अहो, तो सदाशिव पुन्हा रडू लागला. काय झालंय ते पाहून येऊ.'

'अगं त्याचा स्वभाव त्याला नडतो आहे. आहे ते त्याला टिकवता येत नाही असं मी म्हणतो ते काही खोटं नाही.'

'तुम्ही चला. मला बघायचंय त्याला काय दुःख आहे!' लक्ष्मी हट्टानं म्हणाली.

पुन्हा कुंभार कुंभारीण बनून लक्ष्मी–विष्णू सदाशिवकडे आले. विष्णूने विचारले, 'अवं सदाभाऊ, आता कशापायी रडताईसा? डाळ–तांदूळ मिळालं नव्हं?'

'अहो नाही मिळालं. बायकोनं ते मडकं आपटलं!' सदाशिव म्हणाला.

'बरं आता हे मडकं घ्या आणि रोज लाडू, पेढे, बर्फी, जिलब्या खा. म्हंजी तुमची बायको भांडायची न्हाई.' म्हणत कुंभारणीने त्याला मडकं दिलं.


विष्णू म्हणाला, 'ह्यो मडकं घेऊन सरळ घरला जावा. वाटेत कुणाकडं देऊ नका. दार लावून 'पड रे पड' म्हणा बरं का!' मग लक्ष्मी व विष्णू अंतर्धान पावले. सदाशिव दबकत दबकत घरी निघाला. तो तसा चालताना पाहून वाटेतील घारूमामा वाण्याने मोठ्याने विचारले, 'काय सदाशिव, आज देवळात जाणार असशील तर ते मडकं माझ्याकडे ठेवून जा बरं!'

'नाही. हे मडकं सरळ घरीच नेणार आहे मी!' सदाशिव म्हणाला व तो घराकडे निघाला. घारूमामाही त्याच्या मागोमाग होताच! सदाशिव घरात शिरला व त्याने दार लावून घेतले. घारूमामा खिडकीतून आत पाहू लागला.

सदाशिवने मडके पालथे केले व 'पड रे पड' म्हणाला. त्याबरोबर त्या मडक्यातून लाडू-पेढे-बर्फी-जिलेबी असे मेवा-मिठाईचे पदार्थ पडू लागले. हवे तेवढे पदार्थ पडल्यावर सदाशिवने मडके सरळ केले व भांड्याच्या फळीवर ठेवले. घारूमामाने ते दृश्य पाहिले व तो मेवामिठाई पाहून जिभल्या चाटत निघून गेला.

इतक्यात सदाशिवची बायको बाजारातून भाजी घेऊन घरात आली. पहातो तो काय, जिलेबीचा ढीग, पेढ्यांचा ढीग, परातभर बर्फी, घरभर लाडू. तिला आश्चर्य वाटले. ती आनंदाने ओरडून नवऱ्याला म्हणाली, 'अवं धनी, एवढं पदार्थ कवा आन्लासा? किती वर्स झालती लाडू-पेढे खाऊन.' म्हणून ती बकाबका लाडू-पेढे खाऊ लागली. शेवटी खाऊन-खाऊन तरी किती खाणार? त्या नवरा बायकोने ते पदार्थ शेजारी-पाजारी गल्लीत सर्वांना वाटून टाकले.

मग रोजच मेवा-मिठाई शिल्लक राहू लागली. सदाशिव व त्याची बायको मेवा-मिठाई वाटू लागली. याचा परिणाम असा झाला की, गावात तात्या हलवाईचे एक मिठाईचे दुकान होते. त्याचा धंदा बसला. त्याच्याकडे कोणी जाईचना. हा तात्या चार रुपयाला एक लाडू विकायचा. तर सदाशिव रुपयाला चार लाडू देऊ लागला.



एकदा तात्या हलवाईकडे किराणा दुकानदार घारूमामा आला व म्हणाला, 'तात्या त्या सदाशिवने स्वस्तात माल विकून तुमचा धंदा बसवला.'

'तेच काही कळेना. हा एवढी मेवा-मिठाई बनवतो तरी केव्हा?' तात्या हलवाई म्हणाला.

'कुठला बनवतो? त्याच्या घरी एक जादूचे मडके आहे. ते मडके पालथे धरायचे व 'पड रे पड' म्हटले की हवी तेवढी मेवा-मिठाई पडत राहते.'

'अरे बापरे!'

'ते मडके कसे पळवता येईल, त्याची योजना करा.' घारूमामा म्हणाला. तात्या हलवाई विचार करत राहिला.

एकदा तात्याला सरदारच्या मुलाच्या लग्नानिमित्त जिलेबी व लाडू बनविण्याचे कंत्राट मिळाले. पाच बैलगाड्या भरतील एवढे लाडू व